लोकमत

# केवळ जिंकण्यासाठी खेळू नका!

क्रीडा विश्वातून



**सुनील वालावलकर**
क्रीडा संघटक

**आपण आपल्या खेळाद्वारे खेळाचा प्रसार किती करू शकतो, कशा प्रकारे जास्तीतजास्त लोकांना खेळाप्रति प्रेरित करू शकतो, असा विचार झाला पाहिजे.**



**'भारतीयांना केवळ** विजयाचा हव्यास आहे. ते खरे क्रीडाप्रेमी नाहीत. फक्त विजय मिळवणे, हेच त्यांच्यासाठी महत्त्वाचे आहे. अव्वल दर्जाच्या क्रीडा क्षेत्रात हार-जीत एकाच नाण्याच्या बाजू असतात आणि त्या दोन्ही समभावाने स्वीकाराव्या लागतात. भारतीयांचा क्रीडा क्षेत्राकडे बघण्याचा हा दृष्टिकोन बदलला पाहिजे. भारतीय केवळ विजेत्या खेळाडूंनाच डोक्यावर घेतात. या क्रीडा क्षेत्राचे नुकसान होत आहे.' हे मत आहे ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेते माजी दिग्गज नेमबाज अभिनव बिंद्रा यांचे. दिल्लीत नुकत्याच झालेल्या इंडिया शायनिंग समिटमध्ये बिंद्रा यांनी हे मत व्यक्त केले.

भारतीयांच्या या मानसिकतेला आधुनिक तंत्रज्ञानाने खतपाणी घातल्याचे माझे ठाम मत आहे. आजचे तंत्रज्ञान हे प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यासाठी आणि खेळाडूंना जिंकवण्यासाठी भूमिका निभावत आहे. सामन्यातील विजयी फटके, विजयी क्षण वेगवेगळ्या कोनांतून (अँगल) दाखवणे सुरू झाले आहे. सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे प्रेक्षकांमध्ये खेळाडूंप्रति रेटिंग अधिक वाढली जात आहे. स्टेडियममध्येही प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे स्क्रीन्स लागले जात आहेत. शिवाय 'वायफाय'मुळे सहजपणे उपलब्ध झालेल्या इंटरनेटमुळे प्रेक्षकांना विजयी क्षणांची माहिती तीव्र गतीने मिळते. येथे कोणी खेळाचा आनंद घेताना दिसत नाही.

जिंकण्याच्या हव्यासापोटी प्रेक्षकांची संख्या वाढत आहे. कारण, स्पर्धा पाहून, आपण जिंकू शकणार नाही, असा विचार करून मोठ्या संख्येने लोक खेळाकडे न वळता प्रेक्षक स्टँडकडे वळत आहे. स्वतःच्या आनंदासाठीही खेळता येते, हे कोणाच्याही ध्यानी येत नाही.

खेळाडूंच्या जर्सीवर अनेक जाहिराती बघावयास मिळतात. हे इतक्या उच्च स्तरावर गेले आहे की, यामुळे खेळाडूंना एक वेगळीच प्रेरणा मिळते आणि यामुळे त्यांच्याकडून केवळ विजय मिळवण्याचा प्रयत्न होताना दिसतो. आज स्मार्ट वॉचद्वारे क्षणाक्षणाला आपल्याला शरीराची माहिती मिळते. हे सर्व नमूद करताना, तंत्रज्ञान नको, असे मी म्हणणार नाही. तंत्रज्ञान पाहिजेच; पण क्रीडाक्षेत्राला अधिक प्रोत्साहन मिळेल, असे तंत्रज्ञान हवे. याच तंत्रज्ञानाचा आधार घेऊन खेळाडू फसवेगिरीही (चिटिंग) करू लागले आहेत. विजयाची ही भरमसाठ 'भूक' खेळाडूंसाठी हानिकारक ठरू शकते. त्यांना सातत्याने आपल्या चाहत्यांसाठी जिंकायचे आहे. जिंकणे आवश्यक आहेच; पण हे सर्व मैत्रीपूर्ण वातावरणात असले पाहिजे. आपण आपल्या खेळाद्वारे खेळाचा प्रसार किती करू शकतो, कशा प्रकारे जास्तीत जास्त लोकांना खेळाप्रति प्रेरित करू शकतो, असा विचार झाला पाहिजे. खरा खेळाडू तोच असतो, जो मैदानाबाहेर पडताना त्याच्यातील विजेता किंवा पराभूत होणाऱ्याला मैदानातच ठेवतो. मैदानाबाहेर विजेता कोण आणि पराभूत कोण, हा फरकच राहिला नाही पाहिजे. मी खेळलो, मी विजयी झालो किंवा पराभूत झालो, मी खेळाचा आनंद घेतला आणि यातून शिकलो, अशा मानसिकतेनेच मैदानाबाहेर पडले पाहिजे.